23 JAN 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ६०७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने ७१ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी ४ हजार ११९ विद्यार्थी उपस्थित होते. एकूण ६०७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

2 3 JAN 2026

तरूण भारत

# ई-कन्टेन्ट निर्मितीत व्यक्तिमत्व महत्त्वाचे

## ज्येष्ठ रंगकर्मी तुषार भद्रे यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आजच्या बदलत्या जीवनशैलीत केवळ तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे पुरेसे नसून चांगला माणूस असणे गरजेचे आहे. तसेच ई-कन्टेन्ट निर्मितीसाठी आवाज, व्यक्तिमत्व असणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी, उच्चारशास्त्र तज्ज्ञ तुषार भद्रे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम-उषा योजनेंतर्गत विविध विद्याशाखांच्या अध्यापन व अध्ययनासाठी 'इंटरॲक्टिव्ह ई-कन्टेन्ट विकसन' या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे पीएम-उषा योजनेचे नोडल अधिकारी प्रा. डॉ. गोविंद कोळेकर उपस्थित होते. भद्रे म्हणाले की, जीवनात कोणतेही तंत्र वापरले तरी त्यामागील परफॉर्मन्स आणि भावनिक प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. प्रा. डॉ. कोळेकर म्हणाले की, पीएम-उषा योजनेच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण ई-कन्टेन्ट निर्मितीसाठी प्रशिक्षण दिले जाते.



**कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना ज्येष्ठ रंगकर्मी तुषार शिंदे.**

23 JAN 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क अ
शिवाजी विद्यापीठ

# तंत्रज्ञान हीच आजची लेखणी : गुप्ता

## शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागात 'आयसीटी'वर राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आधुनिक काळात तंत्रज्ञानाशिवाय तरणोपाय नाही. यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण क्षेत्रात आणखी आमूलाग्र बदल घडवणे महत्त्वाचे आहे. यामुळे विद्यार्थी व शिक्षकांची तंत्रज्ञान हीच आजची लेखणी आहे. त्याचा वापर सावधानतेने केला पाहिजे, असे स्पष्ट मत 'सी-डॅक'चे शास्त्रज्ञ मनीषकुमार गुप्ता यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापाठाच्या हिंदी विभागात पीएम उषा सॉफ्ट कॉम्पोनंट योजनेंतर्गत मंगळवारी 'भाषा प्रयोग एवं अध्यापन में आयसीटी' विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते.

प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले. प्रथम सत्राच्या प्रमुख पाहुण्या ओडिसा येथील सेंच्युरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंटच्या प्रा. डॉ. प्रज्ञा पाणी होत्या. त्या म्हणाल्या, अध्यापन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या प्रकारे करू शकतो. एआयच्या माध्यमातून डेटावर प्रक्रिया करून ऑडिओ व्हिडीओ, ग्राफ, पीपीटी काहीही क्षणांत बनवू शकतो.

दुसरे प्रमुख वक्ते पाँडेचरी विद्यापीठाचे डॉ. सी. जयशंकर बाबू यांनी भाषा विकासात तंत्रज्ञानाचा कसा उपयोग होऊ शकतो, तसेच आयसीटीच्या माध्यमातून आपण लुप्त होत चाललेल्या भाषांचे व बोलींचे कशाप्रकारे संरक्षण करू शकतो, यासंदर्भात माहिती दिली. प्रत्येक भाषेसाठी 'लँग्वेज लॅब' असावी, असेही मत व्यक्त केले. प्रथम सत्राच्या अध्यक्षा संगणक विभागप्रमुख डॉ. कविता ओझा होत्या.

पाहुण्यांची ओळख राणी नलवडे, डॉ. प्रकाश मुंज यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. सुषमा चौगले, डॉ. गीता दोडमणी यांनी केले. आभार डॉ. अक्षय भोसले, डॉ. अनिल मकर यांनी मानले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. प्रतीक्षा ठुंबरे आदी उपस्थित होते.

2 3 JAN 2026

तरुण भारत



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना शास्त्रज्ञ मनीषकुमार गुप्ता.

# 'विद्यार्थी, शिक्षकांची तंत्रज्ञान हीच लेखणी'

कोल्हापूर : आधुनिक काळात तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण क्षेत्रात आणखी अमूलाग्र बदल घडविणे महत्त्वाचे आहे. यामुळे विद्यार्थी व शिक्षकांची तंत्रज्ञान हीच आजची लेखनी आहे. त्याचा वापर सावधानतेने केले पाहिजे, असे प्रतिपादन 'सी–डॅक''चे शास्त्रज्ञ मनीषकुमार गुप्ता यांनी केले. शिवाजी विद्यापाठाच्या हिंदी विभागात 'पीएम उषा'' सॉफ्ट कॉम्पनंट योजनेअंतर्गत 'भाषा प्रयोग एवं अध्यापन में आयसीटी'' विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पहिल्या सत्राच्या ओडिसा येथील सेंच्युरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंटच्या प्राध्यापिका डॉ. प्रज्ञा पाणी म्हणाल्या, एआयच्या माध्यमातून ऑडियो–वीडियो, ग्राफ, पीपीटी काहीही एक क्षणात बनवू शकतो. पाँडेचरी विद्यापीठाचे डॉ. सी. जयशंकर बाबू यांनी भाषा विकासात तंत्रज्ञानाचा उपयोग, भाषा व बोलींचे कशाप्रकारे संरक्षण करू शकतो, यासंदर्भात माहिती दिली. डॉ. कविता ओझा व डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. राणी नलवडे व. डॉ. प्रकाश मुंज यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. सुषमा चौगले व डॉ. गीता दोडमणी यांनी सूत्रसंचालन केले. आभार डॉ. अक्षय भोसले व डॉ. अनिल मकर यांनी मानले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. प्रतीक्षा ठुंबरे आदी उपस्थित होते.

2 3 JAN 2026

जनप्रवास

# राज्य महिला आयोगातर्फे आज विद्यापीठात 'सक्षमा' कार्यक्रम

• महिलांविषयक कायदे, जाणीव-जागृती व अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरणाचा उपक्रम

जनप्रवास : कोल्हापूर

राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सक्षमा' महिलांविषयक कायदे, जाणीव-जागृती व अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण या क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी (२३ रोजी) सकाळी ११ वा. विद्यापीठात केले. ही माहिती विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली.

डॉ. देसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३ (पॉश कायदा) आणि गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा (पीसपीएनडीटी) यांबाबत जनजागृती, त्यांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच अंधश्रद्धा निर्मूलनातून महिलांचे सक्षमीकरण करणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले. उद्घाटन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या हस्ते होणार असून, यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

पहिल्या सत्रात नोकरदार महिला व विद्यार्थिनींना सुरक्षा प्रदान करणारा 'पॉश' कायदा नेमके काय सांगतो, यावर प्रा. डॉ. भारती पाटील मार्गदर्शन करणार आहेत. या कायद्यान्वये स्थापन केलेल्या अंतर्गत तक्रार निवारण समितीची रचना, कार्ये, अधिकार आणि तक्रारींवर कार्यवाही करण्याची पद्धत यांबाबत अनुभवी कायदेतज्ज्ञ साधना खटी संवाद साधतील. तसेच, गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यान्वये चाचणीद्वारे लिंगनिदान करणे हा गुन्हा आहे, यावर डॉ. सुनील कुबेर, गीता हसुरकर आणि ॲड. गौरी पाटील संबोधित करतील. अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरणासाठी आजच्या काळात वैज्ञानिक दृष्टिकोन का आवश्यक आहे, यावर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या ॲड. सीमा पाटील आणि नंदिनी जाधव आपले विचार मांडतील.

2 3 JAN 2026

पुण्यनगरी

# महिला आयोगाचा आज सक्षमीकरण कार्यक्रम

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सक्षमा' महिलांविषयक कायदे, जाणीव-जागृती व अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण या क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, दि. २३ रोजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह येथे केले आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३ (पॉश कायदा) आणि गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा (पीसपीएनडीटी) याबाबत जनजागृती, त्यांची प्रभावी अंमलबजावणी, अंधश्रद्धा निर्मूलनातून महिलांचे सक्षमीकरण करणे हा उद्देश आहे. 'सक्षमा' कार्यक्रमाचे उद्घाटन महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या हस्ते होणार असून, सदस्य सचिव नंदिनी आवडे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

23 JAN 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज 'सक्षमा' कार्यक्रम

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सक्षमा' महिलांविषयक कायदे, जाणीव-जागृती व अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण या क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आज आयोजन केले आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली. डॉ. देसाई म्हणाल्या, कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. 'बेटी बचाव बेटी पढाव' अभियान समितीचे सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पहिल्या सत्रात नोकरदार महिला व विद्यार्थिनींना सुरक्षा प्रदान करणारा 'पॉश' कायदा नेमके काय सांगतो, यावर प्रा. डॉ. भारती पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

2 3 JAN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज 'सक्षमा' उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत सुरक्षित आणि सक्षम बनवण्याच्या उद्देशाने राज्य महिला आयोग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २३) 'सक्षमा' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा उपक्रम होणार आहे.

2 3 JAN 2026

सकाळ



कोल्हापूर : मराठी विभागातील व्याख्यानात बोलताना 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ. शेजारी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. बी. एम. हिर्डेकर आदी.

# वि. स. खांडेकर अव्वल दर्जाचे ध्येयवादी लेखक : विनोद शिरसाठ

## शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २२ : वि. स. खांडेकर यांच्या साहित्याने एका पिढीला ध्येय दिले. काळाच्या पटलावर लेखकाचे साहित्य किती वाचले जाते, यावर त्या साहित्याचे मूल्यमापन ठरत असते. अशा अनेक कसोट्यांवर टिकणारे खांडेकर हे अव्वल दर्जाचे ध्येयवादी लेखक होते, असे प्रतिपादन 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि डॉ. अनंत व श्रीमती लता लाभसेटवार प्रन्यास आयोजित भाषा संवर्धन पंधरवड्यात 'खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय?' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर होते.

शिरसाठ म्हणाले, 'खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झालेला नाही. उलट उत्तरोत्तर त्याची औचित्यता वाढत राहिली आहे.' डॉ. हिर्डेकर म्हणाले, 'आदर्श ध्येयवाद कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणून खांडेकरांच्या साहित्याकडे पाहावे लागते. त्यांचे साहित्य वर्तमानाची जाणीव करून देते. स्वप्नीय गुंगीतून जागे करते.'

डॉ. अनंत लाभसेटवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. आर. जी. कुलकर्णी, डॉ. नीलांबरी जगताप, महावीर शास्त्री उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

2 3 JAN 2026

तरुण भारत

# वि. स. खांडेकर ध्येयवादी लेखक

- विद्यापीठातील कार्यक्रमात विनोद शिरसाट यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

वि. स. खांडेकर यांच्या साहित्याने एका पिढीला ध्येय दिले. त्यांचे साहित्य वाचून अनेकांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. काहीजण शिक्षक, सहकार, शेतीकडे, व्यापाराकडे वळले. अनेक कसोट्यांवर टिकणारे खांडेकर हे अव्वल दर्जाचे ध्येयवादी लेखक होते, असे प्रतिपादन संपादक विनोद शिरसाठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि डॉ. अनंत व लता लाभसेटवार प्रन्यास आयोजित भाषा संवर्धन पंधरवड्यात ते बोलत होते. 'खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय?" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर होते.

शिरसाठ म्हणाले, लेखनात आणि प्रत्यक्ष जीवनात कमालीची सच्चाई असणारा लेखक म्हणून खांडेकरांना ओळखले जाते. त्यांनी ध्येयाची तुतारी फुंकण्यास समाजाला प्रवृत्त केले. खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झालेला नाही. उलट उत्तरोत्तर त्याची औचित्यता अधिक वाढत राहिली आहे.



**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना विनोद शिरसाठ**

डॉ. हिर्डेकर म्हणाले, वि. स. खांडेकरांचे साहित्य वर्तमानाची जाणीव करून देते. विशेषतः विद्यार्थी वर्गाने त्यांच्या साहित्याशी जोडून घेणे गरजेचे आहे. डॉ. अनंत लाभसेटवार यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी प्रा. आर. जी. कुलकर्णी, डॉ. नीलांबरी जगताप, महावीर शास्त्री आदी उपस्थित होते.

23 JAN 2026

जनप्रवास

# खांडेकर अव्वल दर्जाचे ध्येयवादी लेखक : शिरसाठ

**जनप्रवास : कोल्हापूर**



वि. स. खांडेकर यांच्या साहित्याने एका पिढीला ध्येय दिले. त्यांचे साहित्य वाचून कोणी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. कोणी शिक्षकीपेशा स्वीकारला. कोणी सहकार, शेतीकडे, व्यापाराकडे वळले. हाच त्यांचा वैश्विक दृष्टिकोण असलेला ध्येयवाद होय. काळाच्या पटलावर लेखकाचे साहित्य किती वाचले जाते, यावर त्या साहित्याचे मूल्यमापन ठरत असते. अशा अनेक कसोट्यांवर टिकणारे खांडेकर हे अव्वल दर्जाचे ध्येयवादी लेखक होते, असे प्रतिपादन 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि डॉ. अनंत व श्रीमती लता लाभसेटवार प्रन्यास आयोजित भाषा संवर्धन पंधरवड्यात 'खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय?' या विषयावर ते बोलत होते. माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर अध्यक्षस्थानी होते.

यावेळी अमेरिकास्थित डॉ. अनंत लाभसेटवार यांनी खांडेकर यांच्या साहित्याप्रती कृतज्ञतापर मनोगत व्यक्त केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी प्रा. आर. जी. कुलकर्णी, डॉ. नीलांबरी जगताप, महावीर शास्त्री आणि विद्यार्थी उपस्थित होते.

2 3 JAN 2026

सकाळ

# राज्य महिला आयोगातर्फे आज विद्यापीठात 'सक्षमा' कार्यक्रम

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठातर्फे 'सक्षमा' - महिलांविषयक कायदे, जाणीव-जागृती व अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण हा कार्यक्रम शुक्रवारी (ता. २३) सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. कार्यक्रमाचे उद्‌घाटन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या हस्ते होणार आहे. या आयोगाच्या सदस्य-सचिव नंदिनी आवडे, विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित असणार आहेत. प्रा. डॉ. भारती पाटील, डॉ. सुनील कुबेर, गीता हसुरकर, ॲड. गौरी पाटील, नंदिनी जाधव, ॲड. सीमा पाटील या कार्यक्रमात विविध सत्रांत मार्गदर्शन करणार असल्याची माहिती डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली.

2 3 JAN 2026

लोकसत्ता

# रूपाली चाकणकर आज कोल्हापुरात

कोल्हापूर : राज्य महिला आयोगाच्या



अध्यक्ष रूपाली चाकणकर या आज, शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात महिलाविषयक कायदे, जाणीव, जागृती व अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरणाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी सक्षमा कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

23 JAN 2020

जनप्रवास

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# संशोधक विद्यार्थ्यांनी ग्रीन एनर्जी तंत्रज्ञान विकसित करणे आवश्यक

- ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.प्रमोद पाटील यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

आपणांस कोळसा आणि तेल मोठयाप्रमाणात आयात करावे लागत आहे. यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी ग्रीन एनर्जी तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डी.वाय.पाटील विद्यापीठाचे संशोधन संचालक आणि शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात सुरू झालेल्या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेचा सांगता समारंभ विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.प्रमोद पाटील



बोलत होते. मलेशिया येथील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ.मोहम्मद याहा, डॉ.अहमद ईलियास यांची विशेष उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.संजय चव्हाण होते.

डॉ. प्रमोद पाटील पुढे म्हणाले, अशा प्रकारच्या परिषदांच्या आयोजनामधून विविध आयडीयांची देवाण-घेवाण करून शैक्षणिक संस्था आणि उद्योगधंदे यांच्यामधील आंतर कमी करणे शक्य आहे. आत्मनिर्भरता इंडेक्स वाढून विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी सर्वांच्या विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. देशामध्ये उत्पादीत साहित्य निर्यात होण्याच्या प्रमाणामध्ये वाढ करण्यासाठी प्रगत यंत्रसामग्री आणि उत्पादन क्षमता यांच्यामध्ये वाढ होणे गरजेचे आहे. भारत सरकार उत्पादन क्षेत्राला बळकट करण्यासाठी विविध माध्यमातून सातत्याने प्रयत्न करीत आहे. मर्यादीत स्वरूपात असलेली ऊर्जा मोठयाप्रमाणात उपलब्ध होण्यासाठी नवनवे संशोधन झाले पाहिजे. त्यासाठी ऊर्जेच्या पूर्नवापराचा अभ्यास होणे आवश्यक आहे. शाश्वत विकास हा एक पैलू आहे. औद्योगीक क्षेत्रास नेमके काय आवश्यक आहे हे पाहून ते पुरवठा करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रयत्न करावेत. विद्यार्थी आणि तरूणांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम होणे आवश्यकच आहे. पुढच्या पिढींसाठी पृथ्वीवरील जैवविविधतेचे संवर्धन करण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. तरूणांनी योग्य माहितीच्या आधारे नवनिर्मिती करण्याचा ध्यास घेतला पाहिजे. भारत सरकार विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देत आहे. आपली योजना योग्य असेल तर देश-विदेशातूनही त्यास मागणी होवू शकते. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना याबाबत मार्गदर्शन करावे. नवनिर्मितीच्या माध्यमातून समाजाभिमूख संशोधनाकरिता शिक्षकांनी विद्यार्थी आणि उद्योजकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

यावेळी मार्व्हल्स् इंजिनिअरिंगचे संग्राम पाटील मनोगतामध्ये म्हणाले, तरूण पिढींच्या आत्मनिर्भर भारत बनविण्याच्या संकल्पनेतून आपण जगावर राज्य करू शकतो. यासाठी उत्सफुर्तपणे केलेले प्रयत्न महत्वाचे ठरू शकतात. तरूणांनी वेगवेगळे विषय हाताळू नयेत. ज्या विषयामध्ये आपण पारंगत आहात त्यामध्ये पुढे जाण्यासाठी प्रयत्न करावेत. यश प्राप्त करण्याची जो पर्यंत मनामध्ये भूक निर्माण होत नाही तो पर्यंत तुम्हाला यश प्राप्त होणार नाही. भारत सरकारच्या सोईसुविधांचा लाभ घेता आला पाहिजे. नवीन विचार घेवून विकसित भारत करण्याचा सामुहीक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

JAN 2026

तरूण भारत

जनसंपर्क अधि
शिवाजी विद्यापीठ

# 'ग्रीन एनर्जी' तंत्रज्ञान विकसित होणे काळाची गरज

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद पाटील यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना डॉ. प्रमोद पाटील.

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशाला कोळसा व तेल मोठ्या प्रमाणात आयात करावे लागत आहे. इंधनाच्या अधिक वापरामुळे प्रदुषणाचा प्रश्न वाढतच आहे. यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी ग्रीन एनर्जी तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डी. वाय. पाटील विद्यापीठाचे संशोधन संचालक व शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय शिक्षण–उद्योग–शासन परिषदेच्या सांगता समारंभात ते बोलत होते. मलेशिया येथील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ. मोहम्मद याहा, डॉ. अहमद ईलियास यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. संजय चव्हाण होते.

डॉ. पाटील म्हणाले, आत्मनिर्भरता इंडेक्स वाढून विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी सर्वांच्या विशेष प्रयत्नांची गरज आहे. यावेळी मार्व्हल्स् इंजिनिअरिंगचे संग्राम पाटील म्हणाले, आत्मनिर्भर भारत बनविण्याच्या संकल्पनेतून आपण जगावर राज्य करू शकतो. यासाठी उत्स्फुर्तपणे केलेले प्रयत्न महत्वाचे ठरू शकतात. पुणे येथील एनसीएलचे संचालक डॉ. पी पी वडगांवकर म्हणाले, तरूणांनी प्रगतीसाठी आवाहनांना भिडण्याचे धाडस दाखवावे. उद्योजकतेमध्ये करिअर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. डॉ. एस. एस. चव्हाण म्हणाले, समाज आणि उद्योगासाठी फायदेशीर ठरणाऱ्या गोष्टींवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

दरम्यान, स्टार्टअप प्रदर्शन, इनोव्हेशन हॅकेथॉन, पोस्टर स्पर्धा यामध्ये विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ.गोविंद कोळेकर, डॉ.दिपा इंगवले, डॉ.हेमराज यादव, शिवानंद पाटणे, नितीन वाडकर आदी उपस्थित होते.

### शार्कटैंक कम् हॅकॅथॉन गटामधील श्रेणीप्रमाणे निकाल असा :

शाश्वतता आणि आरोग्यमध्ये दिपक सावंत (प्रथम), राजेश कांबळे (द्वितीय), अभियांत्रिकी आणि फॅबटेकमध्ये अमित चव्हाण (प्रथम), ऐश्वर्या मुंगळे (द्वितीय), माहिती तंत्रज्ञान आणि उद्योन्मुख तंत्रज्ञानाध्ये अभेय वासंबेकर, ओम कोळेकर आणि निलेश पाटील (प्रथम), प्रणव यादव (द्वितीय), सामाजिक व्यवस्थापन आणि वित्तीय तंत्रज्ञान यामध्ये सोहम देशपांडे (प्रथम) यांना मिळाला. पोस्टर प्रझेन्टेशन स्पर्धेमध्ये शाश्वतता आणि आरोग्य यामध्ये महेश पोरे (प्रथम), साहील पाटील आणि वैष्णवी पाटील (द्वितीय), अभियांत्रिकी आणि फॅबटेकमध्ये मृगेंद्र गुरव (प्रथम), सागर पोर्लेकर (द्वितीय), माहिती तंत्रज्ञान आणि उद्योन्मुख तंत्रज्ञान यामध्ये प्रियदर्शनी पाटील (प्रथम), प्रसाद कोळी (द्वितीय), सामाजिक व्यवस्थापन आणि वित्तीय तंत्रज्ञान यामध्ये शंतनू पिसाळ (प्रथम), अश्विनी हवालदार (द्वितीय) यांना मिळाला.

23 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# ऊर्जेच्या पुनर्वापराचा अभ्यास व्हावा

## डॉ. पी. एस. पाटील; विद्यापीठातील शिक्षण-उद्योग-शासन परिषदेचा समारोप



कोल्हापूर : शिक्षण-उद्योग-शासन परिषदेच्या समारोपाप्रसंगी बोलताना डी. वाय. पाटील विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. एस. पाटील. यावेळी शेजारी डॉ. संजय चव्हाण, मोहम्मद याहा, अहमद ईलियास, संग्राम पाटील, पी. पी. वडगांवकर आदी.

कोल्हापूर, ता. २२ : 'कोळसा आणि तेल मोठ्या प्रमाणात आपल्या देशाला आयात करावे लागत आहे. ते कमी करण्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी ग्रीन एनर्जी तंत्रज्ञान विकासावर भर द्यावा. ऊर्जेच्या पुनर्वापराचा अभ्यास व्हावा. औद्योगिक क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार शैक्षणिक संस्थांनी मदत करावी. तरुणांनी योग्य माहितीच्या आधारे नवनिर्मितीचा ध्यास घ्यावा', असे आवाहन डी. वाय. पाटील विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. संजय चव्हाण, तर मलेशिया येथील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ. मोहम्मद याहा, डॉ. अहमद ईलियास प्रमुख उपस्थित होते.

'आत्मनिर्भर भारत बनविण्याच्या संकल्पनेतून आपण जगावर राज्य करू शकतो. यासाठी उत्स्फूर्तपणे केलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरतात. तरुणांनी ते ज्या विषयांमध्ये पारंगत आहेत, त्यामध्ये पुढे जाण्यासाठी प्रयत्न करावेत. नवीन विचार घेऊन विकसित भारत करण्याचा सामूहिक प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे मार्व्हल्स् इंजिनिअरिंगचे संग्राम पाटील यांनी सांगितले.

'तरुणांनी प्रगतीच्या मार्गामध्ये येणाऱ्या आव्हानांना भिडण्याचे धाडस दाखविले पाहिजे. शिवाजी विद्यापीठात संशोधनासाठी आवश्यक असलेली इको सिस्टीम तयार आहे. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी तरुण संशोधकांनी पुढाकार घ्यावा', असे आवाहन एनसीएलचे संचालक डॉ. पी. पी. वडगावकर यांनी केले. 'विद्यापीठात संशोधन कार्याला नवीन दिशा दिली जात आहे. समाज आणि उद्योगासाठी फायदेशीर ठरणाऱ्या गोष्टींवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे डॉ. चव्हाण यांनी सांगितले.

यावेळी डॉ. कल्याणराव गरडकर, गोविंद कोळेकर, दीपा इंगवले, हेमराज यादव, शिवानंद पाटणे, नितीन वाडकर, डॉ. सागर डेळेकर, डॉ. सुभाष माने उपस्थित होते. राजनंदिनी पाटील, अंकिता दळवी यांनी सूत्रसंचालन केले.

### विविध स्पर्धेतील विजेते...

या परिषदेनिमित्त घेण्यात आलेल्या स्टार्टअप प्रदर्शन, इनोव्हेशन हॅकेथॉन, पोस्टर स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख उपस्थितांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. त्यात दीपक सावंत, राजेश कांबळे, अमित चव्हाण, ऐश्वर्या मुंगळे, अभेय वासंबेकर, ओम कोळेकर, नीलेश पाटील, प्रणव यादव, सोहम देशपांडे, महेश पोरे, साहिल पाटील, वैष्णवी पाटील, मृगेंद्र गुरव, सागर पोर्लेकर, प्रियदर्शनी पाटील, प्रसाद कोळी, शंतनू पिसाळ, अश्विनी हवालदार यांचा समावेश आहे.

2 3 JAN 2026

सकाळ



शिवाजी विद्यापीठ : प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे देणगीचा धनादेश देताना डॉ. शहाजीराव देशमुख. शेजारी डॉ. संभाजी शिंदे, रणजित यादव आदी.

# लोकस्मृती वसतिगृहासाठी सव्वातीन लाखांची मदत

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाचे माजी प्राध्यापक डॉ. शहाजीराव बाळासाहेब देशमुख यांनी डॉ. वत्सला देशमुख यांच्या नावे लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ३ लाख २५ हजार रुपयांचा निधी आज प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे सुपूर्द केला. या निधीतून वसतिगृहात निवासी कक्ष उभारण्यात येणार आहे.

विद्यापीठाने विविध उपक्रमांद्वारे सातत्याने सामाजिक बांधिलकीचे आणि विश्वासार्हतेचे नाते समाजाशी जोडलेले आहे. लोकस्मृती वसतिगृह आणि भगवान महावीर अध्यासन ही त्याची उदाहरणे आहेत. या दोन्ही उपक्रमांकडे आजही समाजाच्या विविध घटकांकडून मदतीचा ओघ सुरू आहे. याची प्रचिती सातत्याने येत आहे. त्याबद्दल विद्यापीठ कृतज्ञ आहे, अशी भावना डॉ. जाधव यांनी व्यक्त केली. यावेळी भूगोल अधिविभागाचे डॉ. संभाजी शिंदे, स्थापत्य विभागाचे उपकुलसचिव रणजीत यादव उपस्थित होते दरम्यान, भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी भारती प्रशांत उपाध्ये यांनी ५१ हजार रुपये, तर चवगोंडा आप्पाणा पोमाई यांनी दहा हजार रुपयांची देणगी समन्वयक डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली.

2 3 JAN 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिका
शिवाजी विद्यापीठ, को

# ग्रीन एनर्जी तंत्रज्ञान विकसित करणे आवश्यक

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद पाटील; विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेची सांगता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आपणास कोळसा आणि तेल मोठ्या प्रमाणात आयात करावे लागत आहे. यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी ग्रीन एनर्जी तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डी. वाय. पाटील विद्यापीठाचे संशोधन संचालक आणि शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात सुरू झालेल्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेचा सांगता समारंभ विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. पाटील बोलत होते. मलेशिया येथील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ. मोहम्मद याहा, डॉ. अहमद इलियास यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी मार्व्हल्स इंजिनिअरिंगचे संग्राम पाटील म्हणाले, तरुण पिढीच्या आत्मनिर्भर भारत बनवण्याच्या संकल्पनेतून आपण जगावर राज्य करू शकतो. यासाठी उत्स्फूर्तपणे केलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरू शकतात.

पुणे येथील एनसीएलचे संचालक डॉ. पी. पी. वडगावकर म्हणाले, तरुणांनी प्रगतीच्या मार्गामध्ये येणाऱ्या आवाहनांना भिडण्याचे धाडस दाखवले पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. एस. एस. चव्हाण म्हणाले, शिवाजी विद्यापीठ आता ज्ञानाचे एक अग्रगण्य केंद्र म्हणून ओळखले जात आहे. यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाची विश्वासार्हता वाढलेली आहे. संशोधन कार्याला नवीन दिशा दिली जात आहे. समाज आणि उद्योगांसाठी फायदेशीर ठरणाऱ्या गोष्टींवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

यावेळी डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. हेमराज यादव, शिवानंद पाटणे, नितीन वाडकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी केले. डॉ सुभाष माने यांनी आभार मानले. राजनंदिनी पाटील, अंकिता दळवी यांनी सूत्रसंचालन केले.

**विविध स्पर्धांचे निकाल :** यावेळी झालेल्या विविध स्पर्धांचा निकाल अनुक्रमे असा : शार्कटँक कम हॅकॅथॉन गट : शाश्वतता आणि आरोग्य - दीपक सावंत, राजेश कांबळे. अभियांत्रिकी आणि फॅबटेक - अमित चव्हाण, ऐश्वर्या मुंगळे. माहिती तंत्रज्ञान आणि उद्योन्मुख तंत्रज्ञान - अभेय वासंबेकर, ओम कोळेकर आणि नीलेश पाटील, प्रणव यादव. सामाजिक व्यवस्थापन आणि वित्तीय तंत्रज्ञान : सोहम देशपांडे. पोस्टर प्रेझेंटेशन : शाश्वतता आणि आरोग्य - महेश पोरे, साहिल पाटील आणि वैष्णवी पाटील. अभियांत्रिकी आणि फॅबटेक - मृगेंद्र गुरव, सागर पोर्लेकर. माहिती तंत्रज्ञान आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान - प्रियदर्शनी पाटील, प्रसाद कोळी. सामाजिक व्यवस्थापन आणि वित्तीय तंत्रज्ञान - शंतनू पिसाळ, अश्विनी हवालदार.